श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# Nit Document

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

**मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार,चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाच्या मजूरीचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.**

निविदाधारकास सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून पुढील १ वर्षाचा कालावधी राहील

### : ई–निविदा सूचना :

मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार, चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाच्या मजूरीचे कंत्राट देण्याकरीता ई– निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | :– | मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |
| निविदापुर्व बैठक दिनांक | :– | शनिवार, दि. ०४ जुलै, २०२६ दु. २.०० वा. |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | :– | शनिवार, दि. ११ जुलै, २०२६ सायंकाळी ५.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | सोमवार, दि. १३ जुलै, २०२६, दुपारी ३.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | मंगळवार, दि. १४ जुलै, २०२६ दुपारी ३.०० वा. |
| स्थळ | :– | श्रीसिध्दिविनायक मंदिर न्यास, तिसरा मजला, समिती कक्ष न्यास कार्यालय. |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाच्या मजूरीचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

---

## अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाचा कंत्राट कालावधी १ वर्ष

<u>निविदाधारकास सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून पुढील १ वर्षाचा कालावधी राहील</u>


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सूचना, वार, दिनांक वेळ | २ |
| २ | अटी व शर्ती | ३ ते ७ |
| ३ | ई –निविदा मागविण्याबाबतची माहिती | ८ |
| ४ | निविदेची किमंत, शुल्क, बयाना रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबतची माहिती | ९ |
| ५ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे | १० |
| ६ | अल्पोपहार,भोजन, विशेष भोजन व इ. बनविण्याच्या कामाचा तपशील | ११ ते १४ |
| ७ | निविदाधारकाबाबतची माहिती ( फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर) | १५ |
| ८ | हमीपत्र (नमुना) ५०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर | १६ |
| ९ | मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापालाचे पत्र | १७ |
| १० | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | १८ |


टिप:–निविदाधारकाने प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून तांत्रिक निविदेत (Technical Bid) अपलोड केलेली कागदपत्रे न्यासास सादर करणे आवश्यक आहे

# अटी व शर्ती

१) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाच्या मजूरीच्या कंत्राटाचा कालावधी हा कंत्राटदारास कामाचे आदेश निर्गमित केल्यापासून पुढील १ वर्षाकरिता वैध असेल. या कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे.

२) कामाच्या स्वरुपाची सविस्तर माहिती पान क्र. ११ ते १४ वर देण्यात आलेली आहे. यांची नोंद निविदाधारकांनी मजूरी दर सादर करण्यापूर्वी घ्यावी.

३) दररोज श्रींचा नैवेदय, अल्पोपहार व भोजन बनविण्याचे काम नियमित व वेळेतच होण्याकरीता निविदाधारकाचे कार्यक्षेत्र हे मुंबई, नवी मुंबई व ठाणे या परिक्षेत्रातील असावे.

४) ई–निविदाधारकास देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, हॉटेल्स, रूग्णालये, शासकीय कार्यालय व इत्यादी ठिकाणी स्वयंपाक, भोजन बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

५) निविदाधारक हा हिंदू असावा तसेच निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा. तसेच निविदाधारक संस्थेची कॅटरींग क्षेत्रात मागील ३ वर्षाची सरासरी ६० लक्षापेक्षा जास्त उलाढाल असावी.

६) पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

७) कंत्राट कालावधीत नमुद केलेल्या अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात विशेष प्रसंगी (विविध धार्मिक उत्सव/सण आणि इतर विविध कार्यक्रमादिवशी) अल्पोपहार किंवा भोजन व्यवस्था करण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य मजूरी दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

८) अल्पोपहार व भोजन बनविण्याकरीता आणि जेवण वाढण्यासाठी वाढपी तसेच सफाईकरीता लागणाऱ्या मनुष्यबळाव्यतिरिक्त सर्व कच्चा माल, किराणा माल, भाजीपाला व इतर भांडी, गॅस, शेगडी, पॅकिंग साहित्य मंदिर न्यासातर्फे कंत्राटदारास पुरविण्यात येईल.

९) कंत्राट कालावधीमध्ये अल्पोपहार व भोजन तयार करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास मंदिर न्यासामार्फत कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल. सदर रक्कम कंत्राटदाराच्या बिलातुन वजा करण्यात येईल.

१०) कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने कच्च्या मालासह, स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपूर्वक तसेच जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल.

११) कंत्राटदाराने संपुर्ण स्वयंपाक गृह, जेवण बनविण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व भांडी तसेच जेवण संपल्यानंतर संपुर्ण स्वयंपाक गृहाची (टेबल, जेवणाची भांडी/ताटे, मोरी इ.) साफसफाई / धुणे बंधनकारक राहील.

१२) कंत्राटदाराने दररोज अल्पोपहार व भोजन बनविण्यासाठी आचारी, मदतनीस (भाजी साफ करणे, भाजी चिरणे, चपाती बनविण्यासाठी ई.), जेवण वाढण्यासाठी वाढपी तसेच साफसफाई करण्यासाठी लागणारे कर्मचाऱ्यांची यांची संख्या विचारात घेऊन तसेच विशेष भोजनाच्या पंगतीकरीता (उदा.माघ गणेश उत्सव) यावेळी आवश्यक मनुष्यबळ, टेबल, खुर्च्या व अतिरिक्त भांडयांकरीता लागणाऱ्या बाबींचा खर्च विचारात घेऊन मजूरी दर सादर करावा.

१३) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून आरोग्याचा दाखला **(Health certificate)**, तसेच कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र म्हणून आधारकार्ड न्यासास सादर करणे आवश्यक आहे.

१४) कंत्राट कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व कामगारांची वैद्यकीय तपासणी प्रत्येक सहा महिन्याला करण्यात यावी. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून त्याबाबतच्या वैद्यकीय तपासणी अहवालाची एक प्रत महाप्रसाद विभागाला सादर करावी लागेल.

१५) कंत्राट कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, अप्रॉन घालणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा सर्व खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१६) कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास मंदिर न्यासास होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

१७) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची देणी, त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. जुन्या व नव्याने कंत्राटी कर्मचारी नियुक्त करतांना त्यांचे पोलीस पडताळणी करून घेणेबाबत संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१९) मान्य मजूरी दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने भोजन व अल्पोपहार बनविण्याचे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णतः/अंशतः बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२०) भोजन व अल्पोपहार बनविण्याचे दिलेले काम वेळेत न केल्यास, लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

२१) ज्यांची निविदा मान्य होईल त्या कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत वार्षिक निविदा रक्कमेच्या ५% रक्कम बँक गॅरेंटी म्हणून १ वर्षासाठी मंदिर न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फत सादर केलेली बयाना रक्कम रू. १,००,०००/– वजा करून उर्वरीत रक्कम जमा करावी लागेल.

२२) ई–निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कंत्राटदाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२३) कंत्राटदार हा धार्मिक स्वरुपाचा असावा व त्यांची मंदिराशी आस्था असणे आवश्यक आहे. कंत्राटदार कोणत्याही संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळया यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्या विरुध्द न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे (रु.५००/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकरुन) कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. कामाचे आदेश (Work Order) दिल्यानंतर १५ दिवसांचे आत करारनामा करून देणेसाठी रू. ५००/– चा गैरन्यायीक स्टॅम्प पेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करण्यात येईल.

२४) कंत्राट आदेश व मजूरी बिलाची रक्कम मंदिर न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

२५) श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त कंत्राटदाराला कार्यादेश देवू शकतो.

२६) ई–निविदा भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह सेवाकर (जी. एस. टी) वगळून रक्कम भरावी.

२७) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वरे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी मंदिर न्यासास सादर करणे बंधनकारक असेल. तसेच आपत्कालीन परिस्थितीत सदर संच निविदाकाराच्या तांत्रिक निविदेतील कागदपत्राच्या पुर्तता असमर्थतेबाबत न्यासाकडुन ग्राहय धरण्यात येवू शकेल.

२८) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये निविदाधारक स्वतःच्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

२९) कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासास बंधनकारक राहणार नाही.

३०) कंत्राट कालावधीत कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचा कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार कंपनीमार्फत संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट तरतूदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणित प्रत न्यासाकडे १५ दिवसाचे आत दाखल करणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३१) कंत्राटदार यांचेकडील कामगारांना निवासाची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल. सदरील सेवा मंदिर न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

३२) कार्यदिशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा मंदिर न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

३३) सेवाकर, व्यवसाय कर, भविष्य निर्वाह निधी योजना निधी व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

३४) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३५) ई–निविदाधारकाने साईटवरील इन्चार्ज किंवा पर्यवेक्षण करणारी व्यक्ती पूर्ण व्यवस्थापन नियोजन व सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेसाठी असेल. त्यांनी मंदिर न्यास कार्यालयाच्या व्यवस्थापक/पर्यवेक्षक/सहा.पर्यवेक्षक याचेबरोबर समन्वय साधला पाहिजे.

३६) ई–निविदे मध्ये नमूद केलेल्या कामामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार मंदिर न्यासाकडे राहील.

३७) मंदिर न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर दरमहा देयकाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

३८) निविदेमध्ये नमूद केल्यानुसार कंत्राटदाराचा कालावधी संपला तरी नविन कंत्राटराराची नेमणूक होईपर्यंत कंत्राटदाराने पूर्वीच्या दराने काम करून देणे आपणावर बंधनकारक राहील. याकरीता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

३९) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम दिल्याचे आढळल्यास कंत्राटदाराची निविदा रद्द करून त्याची मंदिर न्यासाकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जमा करण्यात येईल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

४०) मंदिर न्यासाने नेमुन दिलेली कामे ठरलेल्या वेळेत करत नसल्यास, कामात चालढकल करत असल्यास, अथवा समाधानकारक काम करत नसल्यास न्यासाकडून कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटदारास दिलेल्या कामाचे कंत्राट रद्द करेल व निविदाधारकाची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल. या कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

४१) भोजन बनविण्यासाठीच्या स्वयंपाकगृहाची पाहणी करण्याकरीता महाप्रसाद विभागात सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

४२) ई–निविदामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा तसेच न्यासाच्या संबंधित कामकाजाचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात संबंधित अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करावा.

४३) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार मंदिर न्यास समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| श्रीमती.वीणा पाटिल, कार्यकारी अधिकारी | ९९३०९४२४२८ |
| डॉ.संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी | ७९७७७५३७१६ |
| श्री.मंगेश कुंटे,पर्यवेक्षक | ९७०२०२०३४२ |

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


## ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती

१) सकाळचा अल्पोपहार व दररोज दुपारचे भोजन बनविण्याच्या मजूरीच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

२) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या मजूरीच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता (पान क्र. ९ वरील) कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) मध्ये अपलोड करावी. तसेच तांत्रिक निविदा (Technical Bid) च्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा शुल्क (Tender Fee) रक्कम रु. ५,०००/– व बयाना रक्कम (EMD) रक्कम रू. १,००,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४) निविदा शुल्क रक्कम व बयाना रक्कमेबाबतच्या पावती प्रत अपलोड करावी लागेल. निविदा शुल्काची रक्कम व बयाना रक्कमेशिवाय सादर केलेली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

५) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

६) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसुचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. सदर दाखला रु. २५,००,०००/– रक्कमे इतका असावा.

७) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

८) ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, अल्पोपहार व भोजन बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| अ. क्र. | तपशिल | प्रतिदिन भोजन/अल्पोपहार बनविण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | अल्पोपहार, चहा, दुपारचे भोजन (कर्मचारी आणि हवनाकरीता) | अंदाजे २७५ व्यक्ती | ५,०००/– | १,००,०००/– |

टिप : वर नमूद भोजनाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | तपशिल | प्रतिदिन भोजन/अल्पोपहार बनविण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) | अपेक्षित कमीत कमी तीन आर्थिक वर्षाची सरासरी उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (इ) | (फ) |
| १ | अल्पोपहार, चहा, दुपारचे भोजन (कर्मचारी आणि हवनाकरीता) | २७५ व्यक्ती | रु. २५,००,०००/– | ६०,००,०००/– |

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


# निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ. क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / व्यवसाय परवाना (Trading Licence) |
| ४ | आयकर नोंदणी (पॅन कार्ड) |
| ५ | कामगार भविष्य निर्वाह निधी संघटना नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र प्रत |
| ७ | राज्य कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | सेवाकर नोंदणी दाखला (GST Registration Certificate) |
| १० | राष्ट्रीयकृत/अनुसूचित बॅकेचा रु.२५ लक्ष इतक्या रकमेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) आयकर परतावा |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) सेवाकर परतावा |
| १३ | सन (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५) या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र.<br>**टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल ६० लक्षापेक्षा जास्त असावी.** |
| १४ | अनुभवाचा तपशील (तीन वर्ष कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र/कार्यादेश/देयक) |
| १५ | हमी पत्र (रु.५००/– च्या स्टॅम्पपेपरवर) |
| १६ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |
| १७ | मुळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ<br>**टीप – मुल्य निविदा तांत्रिक निविदेत भरल्यास अपात्र ठरविण्यात येईल.** |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# चहा व नाष्टा (अल्पोपहार) बनविण्याच्या कामाचा तपशील

**चहा** :– दररोज सकाळी व संध्याकाळी ४५० व्यक्ती

**अल्पोपहार** :– १. दररोज सकाळी २२५ ते २५० व्यक्ती
**(अमर्यादीत)** २. हवनादिवशी २५ ते ३० व्यक्ती

## नाष्टयाकरीता (अल्पोपहार) पदार्थ

१. कांदे पोहे
२. उपमा
३. मिसळ पाव
४. खमण ढोकळा (मिरची व कोथिंबीर चटणी)
५. समोसा/ बटाटा वडा/ डाळ वडा/ कटलेट/ दोन भजी/कोथंबीर वडी इ. (सोबत मिरची कोथिंबीर मिक्स् चटणी व गोड चटणी)
६. मेदु वडा सांबर
७. इडली सांबर
८. उपवासाच्या दिवशी :– साबुदाणा वडा (३ नग प्रति प्लेट) व साबुदाणा खिचडी/ रताळे व रताळयांचा कीस इ.(सोबत खोबऱ्याची चटणी)

वरीलप्रमाणे कोणताही एखादा पदार्थ बनविल्यानंतर परत तोच पदार्थ एक आठवडयानंतर किंवा सर्व पदार्थ क्रमाने अथवा महाप्रसाद विभागाने दिलेल्या सुचनेनुसार बनवावे लागतील.

## भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील

| | |
|---|---|
| दररोज दुपारचे भोजन + हवनाकरीता भोजन (अंदाजित २७५ व्यक्तीकरीता) साधारणत: प्रति माह उपलब्ध तिथीनुसार ८ ते १० हवनपूजा संपन्न होतात. | नियमित दुपारच्या भोजनातील पदार्थ<br>चपाती, सुकी भाजी / रस्सा भाजी (कडधान्य), पालेभाजी किंवा फळभाजी, डाळ किंवा आमटी किंवा वरण, साधा भात, गोड पदार्थ (शेवयाची खीर किंवा शिरा किंवा लापशी), कोशिंबीर किंवा सलाड, लोणचे व पापड, श्रींच्या नैवेद्यांकरीता ५१ उकडीचे मोदक<br>सत्यनारायण पूजेचा प्रसाद (प्रति पूजेनुसार एक किलो), श्रींचा नैवेदय |
| | हवनानिमित्त बनविण्यात येणाऱ्या भोजनातील पदार्थ<br>पुरी, सुकी भाजी / रस्सा भाजी (कडधान्य), बटाटा वडा किंवा बटाटा भजी, डाळ किंवा आमटी किंवा वरण, पुलाव/मसाले भात, साधा भात, गोड पदार्थ (जिलेबी किंवा शेवयाची खीर किंवा गुलाब जाम ), ताक, चटणी, कोशिंबीर, लोणचे व पापड, श्रींच्या नैवेद्यांकरीता ५१ उकडीचे मोदक, हवनाकरीता तळणीचे ११०० मोदक |

टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# विशेष भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील

**विशेष भोजन** :– १. हवन पूजेकरिता एकूण २५ ते ३० व्यक्ती (अमर्यादित)

२. माघ महोत्सव :– श्री गणेश जयंती व रथसप्तमी या दोन दिवशी १००० ते १२०० व्यक्ती तसेच उर्वरित दिवशी ६५० ते ७५०व्यक्ती (पंगत पध्दत)

३. सर्व हिंदू सणांदिवशी २५० ते २७५ व्यक्ती

## विशेष भोजनातील पदार्थ

१. एक सुकी भाजी :– बटाटा/ भेंडी/ दुधी/ सुरण/पालेभाजी/ झुणका/ मूग/ मटकी/ मटर/ कोणतीही फळ भाजी ई.

२. रस्सा भाजी :– डाळींबी/ पनीर/ मटकी/ काजू/ छोले/ मटर/ चणा/ चवळी/ मूग/ राजमा/कुर्मा/ कोल्हापूरी/ काळा/ हिरवा/ सफेद वाटाणा/ कोणतीही एक फळभाजी ई.

३. चपाती/पुरी

४. डाळ/आमटी

५. साधा भात, मसाले भात/पुलाव

६. फरसाण पदार्थ :– कोथंबीर वडी/ आळूवडी/ समोसा/ बटाटा वडा/ कटलेट/ दोन भजी पदार्थ ई

७. पापड, लोणचे, सलाड

८. दही/ताक

९. गोड पदार्थ (गुलाबजाम/ आम्रखंड/ श्रीखंड/ आमरस/ बासुंदी/ उकडीचे मोदक/ हलवा (गाजर/दुधी)/ पुरणपोळी इ.)

टीप : उक्त नमुद कामासंदर्भात होऊ शकणाऱ्या कामातील बदल विचारात घेऊन न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पूर्तता करावी लागेल. अंगारक संकष्ट चतुर्थी, मंदिरात होणारे उत्सव/कार्यक्रमांदिवशी महाप्रसाद विभागाने दिलेल्या सूचनेनुसार वाढीव संख्येनुसार पदार्थ बनवावे लागतील. तसेच विशेष भोजनाच्या पंगतीकरीता (उदा.माघ गणेश उत्सव) यावेळी आवश्यक मनुष्यबळ, टेबल, खुर्च्या व अतिरिक्त भांडे या सर्व बाबींची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

# "श्रीं" चे नैवेद्य, हवन, श्रीसत्यनारायण पूजा व श्रीसत्यविनायक पूजा याकरीता प्रसाद

१. **श्रीं च्या नैवेद्याकरिता** :– दररोज उकडीचे ५१ नग मोदक

२. हवन :– प्रति हवन तळलेले लहान आकाराचे ११०० नग मोदक

३. **श्रीसत्यनारायण पूजा** :– प्रति पूजा सव्वा किलो रव्याचा शिरा

४. **श्रीसत्यविनायक पूजा** :– प्रति पूजा तळलेले मध्यम आकाराचे २१ नग मोदक (उकडीच्या मोदकाच्या आकाराचे)

(फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर)

**निविदाधारकाबाबतची माहिती**

**१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव** :-----------------------------------------------

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ब. दूरध्वनी क्र. :-----------------------------------------------

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :-----------------------------------------------

ड. फॅक्स क्र. :-----------------------------------------------

इ. ई–मेल :-----------------------------------------------

**२) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह)** :-----------------------------------------------

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :-----------------------------------------------

**३) सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता** :-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**४) जीएसटी नोंदणी क्र.** :-----------------------------------------------

**५) आयकर नोंदणी पॅन क्र.** :-----------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

# (५०० रुपयेच्या स्टॅम्पपेपरवर)

# हमीपत्र

दिनांक — / /२०२६

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई — ४०००२८

मी/आम्ही ------------------------------------------------ खालील निम्न

स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.
२. निविदा अटी — शर्ती नुसार चहा, नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन इ. सुस्थितीत व ताजे बनविण्याचे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता कंत्राट कालावधीत करू.
३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये सेवाकर वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.
४. आमची निविदा स्वीकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बॅक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.
५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.
६. आम्हास माहित आहे की, निविदा स्वीकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.
७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(सनदी लेखापाल यांच्या लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ........................................................................

...........यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२०२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२२–२०२३ | |
| २ | वर्ष २०२३–२०२४ | |
| ३ | वर्ष २०२४–२०२५ | |
| | सरासरी एकूण उलाढाल | |

दिनांक :– / / २०२६

ठिकाण :–

सनदी लेखापालाची सही / चार्टर्ड अकाटंन्ट
(नांव / सही शिक्का)

नोंदणी क्रमांक :–

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक – / / २०२६

# मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

## चहा व नाष्टा (अल्पोपहार), नियमित भोजन, विशेष भोजन, हवन पूजा, श्रीसत्यनारायण व श्रीसत्यविनायक पूजेंकरीता मजूरी दर

निविदाधारकाचे नाव :————————————————————

निविदाधारकाचा कायमचा पत्ता:————————————————————

————————————————————————————

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक ————————————————————

जी एस टी क्रमांक ————————————————————

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रतिदिन/ प्रति हवन/प्रति उत्सव | वार्षिक संख्या | निविदाकारांना सादर करावयाचे मजूरी दर (कर वगळून) | एकूण वार्षिक मजूरी रक्कम रु. (कर वगळून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | चहा ((दोन्ही वेळा | ४५० | १,६२,००० | प्रति कप रु............ | |
| २ | अल्पोपहार | २५० | ९०,००० | प्रति प्लेट रु. ............ | |
| ३ | नियमित भोजन | २५० | ९०,००० | प्रति प्लेट रु............ | |
| ४ | विशेष भोजन (उत्सव व अंगारक संकष्ट चतुर्थीकरीता) | | ६,५०० | प्रति प्लेट रु. ............ | |
| ५ | विशेष भोजन (हवन व सर्व हिंदू सण) | | २,५०० | प्रति प्लेट रु............ | |
| ६ | उकडीचे मोदक | | १८,३६० | प्रति नग रु. ............ | |
| ७ | तळलेले लहान आकाराचे मोदक (हवनाकरीता) | | ६६,००० | प्रति नग रु. ............ | |
| ८ | रव्याचा शिरा (सव्वा किलो) | | ७२० | प्रति सव्वा किलो रु............ | |
| ९ | तळलेले मध्यम आकाराचे मोदक (उकडीच्या मोदक आकाराचे) | | १,५१२ | प्रति नग रु............ | |
| | | | | एकूण | |

निविदाधारकाची सही व शिक्का